मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) मध्ये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) ( सुधारणा) नियम, २००६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील परिशिष्ट-११ मध्ये—

(अ) स्तंभ-१ मधील "अनुक्रमांक" या शीर्षाखाली ४ हा मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

(ब) स्तंभ-२ मधील "सेवा आणि वर्ग" या शीर्षाखाली अनुक्रमांक-४ समोर "जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (दुय्यम लेखा) प्रथम श्रेणी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

(क) स्तंभ-३ मधील "पद" या शीर्षाखाली अनुक्रमांक-४ समोर "कनिष्ठ सहायक (लेखा)" हा संवर्ग समाविष्ट करण्यात येत आहे.

(ड) स्तंभ-४ मधील "नेमणुकीसाठी अर्हता व नेमणुकीच्या पद्धती" या शिर्षाखाली अनुक्रमांक-४ समोर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे,—

(१) कनिष्ठ सहायक (लेखा) या पदावरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :—

(अ) जिल्हा सेवा (वर्ग-चार) यातील, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि जिल्हा सेवेत (वर्ग-चार) पदावर किमान तीन वर्ष अखंड सेवा केलेल्या योग्य व्यक्तींना पदोन्नती देऊन करण्यात येईल.

किंवा

(ब) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने :—

(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय तेहतीस वर्षांपेक्षा अधिक नसेल ;

(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील ; आणि

(तीन) महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :

परंतु असे की, इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल :

परंतु आणखी असे की, पदोन्नतीने अथवा नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाने प्रचलित नियमानुसार सूट दिली नसेल तर त्याने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

(२) कनिष्ठ सहायक (लेखा) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यासाठी लेखाविषयक कामकाजाचा पूर्वानुभव असलेल्या उमेदवारास अधिक पसंती दिली जाईल.

(३) नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीला त्या पदावर नेमणूक झाल्याची तारीख, अथवा अशा प्रकारच्या विभागीय परीक्षेचे नियम विहित करणारी तारीख यातील जी तारीख नंतरची असेल, त्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल :

परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी अपवादात्मक परिस्थितीत ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा कालावधी लेखी नमूद करून एक वर्षापर्यंत वाढवू शकेल.

(४) या संवर्गात २५ टक्क्यांपेक्षा जास्त नसतील एवढी पदे पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश हिर्लेकर,
शासनाचे उप सचिव.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, मे ३, २००६/वैशाख १३, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ मे २००६

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक सेप्रनि-३३०३/प्र. क्र. २८१/आस्था-९.----महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम २७४, पोट-कलम (२) खंड (एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७



[ किंमत : रुपये ३.००]

भाग चार-ब—(१२४)

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner